7 January 2013

॥ श्री ॥

## अध्याय १३ वा
### — क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग —

१ ते ६ अध्यायात 'त्वम्' पद, ७ ते १२ अध्यायात 'तत्' पद तर १३ ते १८ अध्यायात 'असि' पद आहे. 'त्वम्' अधिक 'तद्' म्हणजे 'असि' पदाचे विवेचन आहे.

सातव्या अध्यायात अपरा व परा प्रकृती बद्दल सांगितले. पंधराव्या अध्यायात क्षर व अक्षर प्रकृतीचे विवेचन आहे. तसेच १३ व्या अध्यायात क्षेत्र व क्षेत्रज्ञाविषयी सविस्तर वर्णन आले आहे.

क्षेत्र म्हणजे देह आणि क्षेत्रज्ञ म्हणजे आत्मा. देह किंवा प्रकृती जड, विकारी, नाशवंत व क्षणभंगुर आहे. याउलट क्षेत्रज्ञ म्हणजे आत्मा चेतन, नित्य, निर्गुण आणि अविनाशी असा आहे. या दोन्हींचे स्वतंत्र रूप भगवंतांनी विभाग करून सांगितले आहे. ∴ या अध्यायाला 'क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग' असे नाव आहे.

या अध्यायात जीवात्मा परमात्मा किंवा पिंड-ब्रह्मांड यांच्या एकत्वाचे निरूपण आहे.

१२ व्या अध्यायात उत्तम भक्तांची ३८ लक्षणे सांगितली आहेत तर १३ व्या अध्यायात ज्ञानयोग्याचे सद्गुण वर्णन केले आहेत. (श्लोक ७ ते ११)

ज्ञाता - ज्ञेय - ज्ञान ही ज्ञानयोगाची त्रिपुटी आहे. या अध्यायातील ज्ञाता (जाणणारा) म्हणजे क्षेत्रज्ञ असून क्षेत्र हे ज्ञेय आहे. इथे देह ज्ञेय आहे की परमेश्वर असा संदेह उत्पन्न होऊ शकतो परंतु एकदा का देहाचे

www.madhaveeraghuveer.com

Notes

SUNDAY 24

| M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | AUG |

भिन्नत्व जाणले की उपासक परब्रह्माच्या अनुभूतीकडे आपोआप झेपावतो.

मी केवळ देहरूपच आहे असे संस्कार आपल्यावर लहानपणापासून झालेले असतात. त्यामुळे आपण देहाचेच चोचले पुरवतो. आत्म्याच्या गोडीकडे लक्षच दिले जात नाही. देहाचे व्यवहार मांडले जातात परंतु आतील आत्मा तसाच राहतो. जेव्हा मी देहाहून वेगळा आहे असे समजेल तेव्हाच मला माझ्यात सुधारणा करता येईल. 'मी' जो कोणी आहे तो या देहाहून भिन्न, सुंदर, पवित्र, अव्यंग असा आहे. स्वतःमधले दोष सुधारायचे असतील तर स्वतःला स्वतःपासून अलग करून आत्मपरीक्षण करणे जमले पाहिजे. जो असे स्वतःचे तटस्थतेने आत्मपरीक्षण करतो त्याला त्याचा दोष दाखवला तर राग येत नाही तो त्या दृष्टीने विचार करतो व आपल्यातील दोष दूर करतो.

मी म्हणजे अविनाशी आत्मा आहे. देह हे मला मिळालेले एक साधन आहे. परमेश्वराच्या घरची शेती करण्याचे ते एक अवजार आहे. हे अवजार बिघडले तर त्यात सुधारणा करायला पाहिजे.

खेळाच्या बाहेर असणारा पंच ज्याप्रमाणे त्रयस्थपणे खेळातील गुणदोष चांगल्या प्रकारे पाहू शकतो त्याप्रमाणे देहबुद्धीपासून दूर राहूनच आपल्याला त्यातले गुणदोष समजू शकतील.

www.madhaveeraghuveer.com

*Notes*

| 2011 | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JUL | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

देहासक्तीमुळे जीवन अडगळीचे झाले आहे. देह म्हणजे मी या घट्ट भावनेने देहाच्या वर्धनासाठी पोषणासाठी, शृंगारण्यासाठी मनुष्याने नाना प्रकारची साधने निर्माण केली आहेत. परंतु हा देह म्हणजे दरफळ आहे. तो किती वेळ जपून ठेवणार? फक्त मरेपर्यंत! मरणाची घडी आली की एक क्षणही देह टिकवता येत नाही. मृत्युपुढे सर्व ऐट थांबते.

देह हे साध्य नसून साधन आहे ही वृत्ती दृढावली तर जीवन निराळेच भासू लागेल. देहाच्या पलीकडचे जे निष्कलंक आत्मतत्त्व आहे ते मी आहे. (देह व आत्मा या अलग गोष्टी आहेत हे ज्या दिवशी खऱ्या अर्थाने कळेल त्या दिवशी खरे शिक्षण, खरा विकास सुरू होईल.)

जोपर्यंत देहात असलेल्या आत्म्याचा विचार नसतो तोपर्यंत मनुष्य दैहिक क्रियांतच मग्न असतो.

१३व्या अध्यायात ज्ञाता व ज्ञेय म्हणजे क्षेत्रज्ञ व क्षेत्र यांचे विवेचन आहे. व पुढे म्हणजे १४ व १५व्या अध्यायात ज्ञानाचे स्वरूप उलगडले आहे. परंतु या अध्यायात ज्ञानी महात्मा कसा असतो हे भगवंत सांगतात.

| | |
|---|---|
| क्षेत्र | क्षेत्रज्ञ |
| ज्ञेय | ज्ञाता |
| प्रकाश्य | प्रकाशक |
| विकारी | अविकारी |
| सोपाधिक सविशेष | निरुपाधिक, निर्विशेष |
| अचेतन | सचेतन |

Notes

www.madhaveeraghuveer.com

युष्मद् प्रत्ययाचा विषय त्वम्

JULY अस्मद् .. " अहम् 2011

# 27

WEDNESDAY इदम् शब्दाने बाह्य विषय (शरीराचा) निर्देश 208-157 Wk - 30

शीर्यमाणस्वभावत्वात् इति शरीरम्

१. आपण सर्व क्षेत्रधारी आहोत. पण या क्षेत्रात नांदणारा जो कोणी आहे तो क्षेत्रज्ञ आहे. ज्ञाता आहे. त्याचे हे मंदिर आहे. 'देह देवाचे मंदिर'

किंवा या देहाला क्षेत्राची उपमा दिली आहे. आणि आत्म्याला शेतकरी म्हटले आहे. क्षेत्र या शब्दावरून शेत हा शब्द आला आहे. शेतकऱ्याला जसे आपले शेत म्हणजे काळी आई वाटते, पवित्र वाटते तसे आपल्या शरीराला पवित्र मानायला हवे.

शेतकरी प्रथम तण काढतो, जमीन स्वच्छ करतो. कोणते पीक घ्यायचे त्याप्रमाणे त्याची मशागत करावी लागते. त्याप्रमाणे आपल्यातले दुर्गुण काढावे लागतात. काढले तरी पुन्हा पुन्हा ते निर्माण होतात. म्हणून या शेतकऱ्याने जागरूक राहिले पाहिजे. शेतकरी जसे शेतावर मनापासून प्रेम करतो तसे क्षेत्रज्ञाला सतत भान असले पाहिजे.

अशा या विनाशी क्षेत्रात (देहात) राहणारा अविनाशी क्षेत्रज्ञ (जीवात्मा) आहे हा भेद जो जाणतो तोच खरा ज्ञानी होय.

२. सर्व क्षेत्रात क्षेत्रज्ञ म्हणजे जीवात्मा मलाच समज. क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांना तत्त्वत: जाणणे म्हणजे ज्ञान !

या शरीरामाजी गुप्त । चैतन्य असे सर्वगत ॥

हे तत्त्वत: जो जाणतो तो आत्मज्ञानी. हे ज्ञान जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत पंचेंद्रियांचे विषय टाकता

*Notes*

१ क्षतत्राणात् इति क्षेत्रम् - जीवाचे आघात दुःखांपासून रक्षण करणारे ---

२. क्षरणात् इति क्षेत्रम् - क्षणाक्षणाला झीज (क्षय) होत असते.

३. क्षेत्रवत् इति क्षेत्रम् - सुपीक जमिनीतून विपुल धान्यनिर्मिती पापपुण्यात्मक कर्म | कामसंकल्परूपी पाणी | सुखदुःखात्मक फळ ---

| 2011 | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JUL | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

४. क्षयात् (नरकपतनात्) त्रायते इति क्षेत्रम् | या पुण्यभूमिमध्ये परमेश्वराच्या चैतन्याचे अस्तित्व आहे [illegible]

www.madhaveeraghuveer.com

धर्मो रक्षति रक्षितः |
शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् | कुमारसंभव



येत नाहीत आणि तोपर्यंत माणसाला आपले शरीर हेच सर्वकाही आहे असे वाटते परंतु जेव्हा चैतन्याची जाणिव आतून व्हायला लागते त्यावेळेला मनुष्य आपोआपच देहाबद्दल अनासक्त होत जातो. वृद्धपणी इंद्रिये थकल्यानंतर विषयांपासून निवृत्त होणे वेगळे आणि शरीर सक्षम असताना, विषय भोगण्याची ताकद असताना रूप, रस, स्पर्श, शब्द, गंध या पाच तन्मात्रांपासून बाजूला होणे हा पुरुषार्थ आहे. हाच परमार्थ आहे. याचेच नाव अध्यात्म! क्षेत्र-क्षेत्रज्ञाचे तत्त्वतः ज्ञान झाले की संसारबंधन सुटते.

३. क्षेत्र कोणते? कोणत्या प्रकारचे? कोणत्या विकारांनी युक्त? त्यापासून कोणते कार्य उत्पन्न होते? क्षेत्रज्ञ कोण? त्याचा प्रभाव कोणता? अशा सहा गोष्टींचा उलगडा भगवंतांनी केला आहे. त्या क्षेत्राचे स्वरूप उलगडण्यासाठी वेद बोलतात. तर्क वाटाघाटी करतो सहा दर्शने त्याच्यापुढे हात टेकतात. संप्रदायही वादंग करतात. परंतु गुरुमुखातून ते ज्ञान प्रकट झाले की उत्तम शिष्य ते तत्काळ ग्रहण करतो. शिष्याच्या पात्रतेप्रमाणे गुरु उपदेश करतात.

निवडिले साचे। उत्तम मध्यम कनिष्ठाचे।

अर्जुन हा उत्तम शिष्य आहे. तो तैलबुद्धी आहे. त्याने अनेक शास्त्र, विद्या प्राप्त केल्या आहेत. त्याला भगवंत हे ज्ञान सांगत आहेत.

Notes

देह देवाचे मंदिर आहे. आत आत्मा परमेश्वर | काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल | जन्मानां नरजन्म दुर्लभम् |
विवेकाचा आश्रय घेऊन अधर्माचा आचरणाचा त्याग हवा.
सदाचार हा थोर सांडू नये तो | जगी तोचि तो मानवी धन्य होतो।

| M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | AUG |

या जडात्मक क्षेत्राला जाणण्यासाठी ज्ञात्याची, प्रमात्याची आवश्यकता
असते तो [illegible]

भारत - भायां अखण्डवृत्तौ एव रमते इति।



प्रकाशामध्ये नित्य रमणारा.

४. परंतु हे ज्ञान पूर्णपणे नवीन नाही. ऋषींनी पृथक् प्रकारांनी सांगितले आहे. नाना प्रकारच्या वेदमंत्रांनी विभागपूर्वक सांगितले आहे. तसेच हेतुयुक्त ब्रह्मसूत्राच्या पदांनीही तसेच सांगितले आहे.

ऋग्वेदाच्या पहिल्या मंडलाच्या १६४ व्या सूक्तातील २० व २२ क्रमांकाच्या ऋचा महत्वाच्या आहेत.

एकमेकांचे जिवलग मित्र असणारे जीव आणि परमात्मरूपी दोन पक्षी एकाच वृक्षाचा आश्रय घेतात. त्यापैकी एकजण (जीव) खालच्या फांदीवर बसून वृक्षाची गोड फळे भक्षण करतो तर दुसरा पक्षी (परमात्मा) ती फळे भक्षण न करता त्याकडे केवळ साक्षीभावाने पहात आहे.

ऋषी - जो द्रष्टा असतो तोच ऋषी / अन्यथा ऋषी नव्हे. ऋषी हा द्रष्टा असतो. त्याला आत्मतत्त्व दिसते म्हणूनच आपल्या वेदांना अपौरुषेय म्हटले आहे. कारण ऋषींनी प्रयत्न करून, स्वप्रतिभेने वैदिक ऋचा लिहिलेल्या नाहीत. त्यांना त्या स्फुरल्या आणि हे जे स्फुरण आहे ते द्रष्टेपणातून प्राप्त झालेले आहे.

ग. दि. मा. हे आधुनिक ऋषीच आहेत. जेव्हा त्यांना आतून प्रेरणा मिळाली तेव्हाच ते रामजन्माचा प्रसंग शब्दबद्ध करू शकले.

छंद याचा अर्थ वेदमंत्र.

वैदिक वाङ्मय

Notes: उपनिषद, वेदांत — वेदांचे सार
ब्राह्मणे — यज्ञयागादि कर्मकांड
आरण्यके — त्यांच्यातील तत्त्वज्ञानाचा गाभा

| 2011 | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JUL | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

संपूर्ण ऋग्वेदाची रचना छंदोबद्ध आहे. त्यातील प्रमुख सात छंद आहेत. गायत्री - २४६७
उष्णिक - ३४१ अनुष्टुभ - ८५५ बृहती - १८१
त्रिष्टुभ - ४२५३ पंक्ती - ३१२ जगती - १३४८
हे प्रमुख छंद आहेत. याशिवाय १२ गौण छंद आहेत.

ब्रह्मसूत्रांनी हे सगळे तत्त्वज्ञान ग्रथित केलेले आहे. किंवा युक्त होऊन निश्चयात्मक बुद्धीने ब्रह्मसूत्रे बोलली आहेत. अशी ५५४ सूत्रे आहेत. त्यातील एकही मात्रा इकडे तिकडे हलवता येणार नाही त्याला सूत्र असे म्हणायचे. $H_2SO_4$, HCl, NaCl

एकम् द्वे, द्वे एकम्, एकम् द्वे
द्वे त्रीणि, त्रीणि द्वे, द्वे त्रीणि।

यात संदिग्धतेला कुठेही वाव नाही.

वेदान्त हा वैदिक मार्ग आहे
ब्रह्मसूत्र हा तार्किक मार्ग आहे
गीता हा स्मार्त मार्ग आहे.

हा स्मार्त मार्ग सामान्यांनी निवडावा. कारण वेदांचे सार वेदांतामध्ये आणि वेदांताचे सार गीतेत आले आहे. साध्या दुधापेक्षा बासुंदी सर्वांना आवडते.

सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनन्दनः।
पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ॥

असे उपनिषदरूपी गायींचे गोपालकृष्णाने दूध काढले आहे. पार्थ हा वासरू आहे. आणि त्या दुधाचा लाभ घेणारा उपासक हा भोक्ता आहे.

www.madhaveeradhuveer.com

Notes

SUNDAY 31

| M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | AUG |

विवेकचूडामणि - ९८

२९ + ७

२९ + ७ = ३६ तत्त्वे

8.00 १. २. पाच महाभूते, अहंकार, बुद्धी, अव्यक्त,
पाच कर्मेंद्रिये पाच ज्ञानेंद्रिये या दहा इंद्रियांचे
9.00 दहा विषय, मन,/इच्छा, द्वेष, सुख, दुःख, चेतना
धैर्य व संघात अशी ३६ तत्त्वे होतात.
10.00 १ पंचीकृत महाभूते    २. अपंचीकृत महाभूते.
मिश्रण    विभागरहित
11.00 ५०% + प्रत्येकी १२.५%    १०० %
शरीरामध्ये ही पाच महाभूते कशी कार्य करतात?
12.00 पृथ्वी - अस्थि, मांस, मज्जा, त्वचा, नाडी, रोम.
आप - शुक्लीत, शोणित, लाळ, मूत्र, स्वेद
1.00 तेज - क्षुधा, तृष्णा, निद्रा, आळस्य, मैथुन
वायु - चलन वलन, प्रसारण, निरोधन, आकुंचन
2.00 आकाश - काम, क्रोध, शोक, मोह, भय.
अहंकार - मी-माझे असे वाटणे.
3.00 ज्ञानेश्वर माउली म्हणतात- जागृतावस्थेत
त्याप्रमाणे स्वप्न, अमावस्येच्या दिवशी चंद्र, लहान
4.00 बालकात तारुण्य व उमलत्या कळीत सुवास,
लाकडात जसा अग्नी गुप्त असतो तसा ~~[illegible]~~
5.00 प्रकृतीच्या पोटात अहंकार गुप्त असतो.
हा अहंकार अज्ञानी पुरुषाच्या मागे विशेष
6.00 लागत नाही परंतु ज्ञानवान पुरुषाचे तो नरडे धरतो.
व त्याला नाना प्रकारच्या संकटात गोवून खायला
7.00 लागतो.
बुद्धी, अव्यक्त - म्हणजे मूळ प्रकृती किंवा ही प्रकृती

*Notes*

| 2011 | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| AUG | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhaveeraghuveer.com

म्हणजे भूतसृष्टीची टंकसाळ होय.

दहा इंद्रिये - कान, त्वचा, नेत्र, जिव्हा, नासिका - ज्ञानेंद्रिये
वाणी, हात, पाय, उपस्थ, गुद - कर्मेंद्रिये.

इंद्रियांचे विषय - शब्द, स्पर्श, रुप, रस गंध
बोलणे, देणे - घेणे, चालणे, मूत्रविसर्जन, मलत्याग.
५ व्या श्लोकात २४ तत्वे तर ६ व्या श्लोकात
७ तत्वे आलेली आहेत.

इच्छा - इंद्रिये व विषय यांची भेट होताक्षणीच
कामाचा हात धरून जी वृत्ति वेगाने उठते ती इच्छा.

द्वेष - इच्छा केल्याप्रमाणे इंद्रियांना इच्छित विषय
प्राप्त न झाल्यास द्वेष निर्माण होतो.

सुख - दुःख - अनुकूलाची प्राप्ती झाल्यावर माणसाच्या
चित्ताला जे समाधान प्राप्त होते ते सुख
प्रतिकूलाची प्राप्ती झाल्यावर चित्ताला जे क्लेश
होतात ते दुःख!

चेतना - जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही अवस्थां-
मध्ये जी बदलत नाही आणि केसांपासून नखांपर्यंत
शरीरात जी सतत जागी असते तिला चेतना म्हणतात.

धृती - बुद्धीमुळे निश्चय होतो पण तो टिकतो
धृतीमुळे. १८ व्या अध्यायात धृतीचे लक्षण व
प्रकार सांगितले आहेत.

संघात - स्थूल देहाचा पिंड
मानवाचा देह पंचमहाभूतांचा बनलेला आहे.
पण त्यांत एकवाक्यता नाही. पाणी पृथ्वीचा नाश

Notes

| T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | SEP |

www.madhaveeraghuveer.com

Publicity stunt - घटं भिन्द्यात् पटं छिन्द्यात् कुर्यात् रासभरोहणम्।
येन केन प्रकारेण प्रसिद्ध पुरुषो भवेत्॥



करते. तेज पाण्याला आटवते. तेज व वायूचे वैर आहे.
आकाश वायूला जिरवते. असे असूनही त्या सर्वांना
एकत्र ज्यामुळे धारण केले जाते तिला <u>धृती</u> म्हणतात
दृढव्रती हे धृती धारण करणारे असतात.
स्वा. सावरकर, लो. टिळक.
अव्यक्त म्हणजे मूळ प्रकृती
जमिनीखालील पाणी दिसत नाही, परंतु जे वृक्षाला
पुष्ट करते त्याप्रमाणे ज्ञान हे ज्ञानवंतांच्या अंतरंगात
असते तरी ते त्यांच्या आचरणातून प्रगट होते.
अहंकारविमूढात्मा कर्ताहमिति मन्यते।
८० ते ९१ ज्ञान कसे आणि त्याची लक्षणे -
१. <u>अमानित्व</u> - ज्याला मान आवडत नाही असा
चातुर्य लपवी महत्त्व हरवी (ज्ञानेश्वर महाराज)
पिसेपण मिरवी आवडीने॥ (शंकर महाराज)
आपले शहाणपण तो लपवून ठेवतो. आपल्याला
असलेला मोठेपणा तो लपवा करतो. मोठ्या आवडीने
लोकात वेडेपणा दाखवतो. लोकांत होणाऱ्या
प्रसिद्धीची ज्याला शिसारी असते. तो शास्त्रांच्या
वादविवाद करण्याचा ज्याला कंटाळा असतो. लोकांनी
आपला अनादरच करावा. नातलगांनी आपल्याला
थारा देऊ नये अशा प्रकारची इच्छा ज्याला असते
ज्यामुळे नम्रता अंगी बाणेल आणि कमीपणा हे
भूषण ठरेल अशाच गोष्टी तो बहुतेक करतो.
<u>ईश्वरचंद्र विद्यासागर</u>, डॉ. राजेंद्रप्रसाद

*Notes*
अमानी मानदो मान्यो लोकस्वामी त्रिलोकधृक् (विष्णुसहस्रनाम)
तर्कवाचस्पती - व्याकरण
Henry Ford | डॉ. विक्रम साराभाई - अंतरिक्ष संशोधन.

| 2011 | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| AUG | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

जीवन [illegible]
बुद्धी, मन, वाणी, इंद्रिये - चार तारा
सुसंवाद, समन्वय

संत तुलसीदास म्हणतात.
सबहि मानप्रद आपु अमानी।
हे ज्ञानी पुरुष इतरांना मान देतात स्वतः मात्र अमानी असतात. विष्णुसहस्रनामात उल्लेख आहे.
अमानी मानदो मान्यो।
२ अदांभित्व - जे आपल्या ठायी अत्यल्प आहे ते वारंवार प्रगट करायचा, फुगवून सांगायचा त्याला आवडते तो दांभिक! दंभामुळे माणसे इतरांची उपेक्षा करतात, स्वतःच्या मानासाठी फार धडपडतात. दांभिक मनुष्य एक करतो अन शंभर सांगतो मात्र ज्ञानी मनुष्य शंभर करतो अन एकही सांगत नाही.
(मिथ्याचार) कुलीन स्त्री ज्याप्रमाणे आपले शरीर झाकते त्याप्रमाणे अदांभित्व धारण करणारा सत्कर्म गुपचुप करतो. अदांभित्वाचे उत्तम उदाहरण म्हणजे आई.
३ अहिंसा - शरीर, मन, वाणी याद्वारे टेखील हिंसा घडू नये. हिंसा तीन प्रकारची असते - कृत, कारित, अनुमोदित | निर्वैरः सर्वभूतेषु | (मानसिक)
४ क्षांति - सहनशीलता, क्षमाशीलता. याचे उत्तम उदाहरण म्हणजे एकनाथ महाराज. (तितिक्षा)
मनाची प्रसन्नता जितकी वाढू तितकी शांती वाढत जाते. क्रोध हा शांतीचा शत्रू आहे. Priest & Peace संत आणि शांत हे जवळचे शब्द आहेत.
५ आर्जव - सरळपणा, ऋजुता. पण म्हणजे भाबडेपणा नव्हे. सौजन्याने दुसऱ्याचे हृदय पालटता येते.

Notes अमृताच्या धारेप्रमाणे अंतःकरण — अर्जुन असा होता.

No anger inside
No enemy outside

सुखदुःखादि द्वंद्वात जो अस्वस्थ नाही त्याला शांतीची प्राप्ती होते.
आत शांति असेल तर प्रसन्नता
Mutual

| T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | SEP |

www.madhaveeraghuveer.com

आत्मज्ञान, ध्यानाभ्यास, तीव्र वैराग्य, उदास वृत्ती, सहजस्वरूपस्थिती, अंतर्बाह्य


निर्मळता, स्वधर्मआस्था, जागरूकता,


विवेक, भक्तीनिरूपण, गुरुवाक्य ...

६. आचार्योपासना - श्रद्धा भक्तीसहित गुरूची सेवा.
अध्यायाचे तीनकोन. रामकृष्ण परमहंस - विवेकानंद (पैलू ...)
निवृत्तीनाथ - ज्ञानेश्वर
जनार्दन स्वामी - एकनाथ
समर्थ रामदास - कल्याण

७. शुचिता - शुद्धता, पावित्र्य | देवद्विजगुरुप्राज्ञपूजनम् |
(सूर्यप्रकाश, पाणी, वायु) बाह्यांगाइतकीच अंतरंग शुचिता सांभाळली पाहिजे.
शरीर स्वच्छ, निरोगी असेल तर मन प्रसन्न रहाते. आणि मन प्रसन्न असेल तर शरीर स्वच्छ ठेवण्याकडे प्रवृत्ती रहाते त्यातून आरोग्य लाभते.
अशा प्रकारे शरीर आणि मन (प्रतिसंवेदी) आहेत. त्याचबरोबर वाचिक शुचिता, मानसिक शुचिता महत्त्वाची आहे. मन जाता है तो जाने दे मत जाने दे शरीर ||

८. स्थैर्य - आत्म्याचे मनाची व बुद्धीची बैठक दृढावली पाहिजे. आपल्या ध्येयापासून विचलित न होता परमार्थसाधनेत दृढपणे राहणे म्हणजे स्थैर्य होय.

९. आत्मविनिग्रह - अंतःकरणनिग्रह
मन, चित्त, बुद्धी व अहंकार यांच्यावर विजय मिळवणे.

१०. वैराग्य - इंद्रियांच्या ठिकाणी वैराग्य उत्पन्न झाले पाहिजे. मुंगीपासून ब्रह्मदेवापर्यंत या सृष्टीतील प्रत्येक गोष्ट अनित्य आहे ही भावना, जुगुप्सा मनात जागली पाहिजे. परंतु तामसी पुरुषाचे कधी कधी उलटे घडते या सर्व गोष्टी अनित्य आहेत म्हणून तो अधिक भोगवादी बनतो.

*Notes* (शौच)
द्रव्यशुद्धि, आहारशुद्धि, उपासनाशुद्धि, शरीरशुद्धि — [illegible]
[illegible]
[illegible]

| 2011 | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| AUG | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhaveeraghuveer.com

◐

11. अनहंकार : इंद्रियजय आला की मन निर्वात होते. एका ठायी स्थिरावते. त्यामुळे अहंकार कमी होतो. भरलेली घागर मौनावते अर्धी घागर आवाज करते. उपासकाने वैराग्य धारण केले की अहंकार आपोआपच विरू लागतो. सूर्याचे उगवणे, वेदांचे बोलणे, गंगेचे वाहणे ज्याप्रमाणे निराभिमानी त्याप्रमाणे ज्ञान्याचे वागणे अहंकाररहित होते.

12. जन्म मृत्यु जरा व्याधि दुःख दोषानुदर्शनम् – या सर्व गोष्टी दुःखदायक आहेत याची जाणीव ज्ञान्याने होते. आणि तो हे जाणतात की यातून अतीत व्हायला हवे. मानवाचे ऐन उमेदीत असणारे पुष्ट शरीर पुढे वार्धक्यात वाकून जाते म्हणून आत्मज्ञानाकडे झेपावणारा मनुष्य इंद्रिये जर्जर होण्यापूर्वीच सत्कृत्ये करतो. रोग होऊ नयेत म्हणून निरोगीपणाचे धडे गिरवतो. बहिरेपणा येण्यापूर्वी उत्तम श्रवण करतो. पांगळेपणा– तीर्थयात्रा, वाचा– पाठांतर, लुळेपणा– दानधर्म आधीच करतो.

आधि– मनाचे विकार, दुःख

व्याधि– शरीराचे विकार, दुःख.

दोन्हींची निर्मिती मूढतेतून होते. पण तत्त्वांचे ज्ञान मिळाले की त्यांचा क्षय होतो. देहाच्या सत्यत्वासाठी

13. असक्तिरनभिष्वङ्गः पुत्रदारा याविषयी अनासक्ती ज्ञानवंताने पुत्र पत्नी गृह याविषयी अनाभिष्वंग असावे. दारा– पत्नी– जी भावंडांमध्ये फूट पाडते ती. या सर्वांविषयी ममत्व न वाटणे म्हणजे निर्मम.

Notes

SUNDAY 7

जातिस्मर – पूर्वजन्माचे ज्ञान | मागील जन्मातील दोष स्मरणात असल्याने या जन्मात त्या चुका करत नाही
जडभरत – हरिणशावक |

| T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | SEP |

मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम् |

जीवन सुखदुःखाची जाळी। त्यात अडकले मानव कोळी।



dependence [illegible] - एकांतात

8 January 2013

१३. समचित्तत्व - माणसाला इष्ट हवे असते आणि अनिष्ट नकोसे वाटते. म्हणून मनुष्य खूप प्रयत्न करतो. परंतु इष्ट-अनिष्ट या दोन्हींच्या बाबतीत ज्या माणसाचे चित्त सम रहाते तो खरा ज्ञानी होय.
लो. टिळक - तुरुंगवास - लेखन - मनुस्मृती गीतारहस्य

१४. अव्यभिचारिणी भक्ती - पतिव्रता स्त्री ज्याप्रमाणे पतीला अनुसरते त्याप्रमाणे ही अनन्यभक्ती आहे.

१६. विविक्तदेशसेवित्व अरतिर्जनसंसदि - ज्ञानी पुरुष हा एकांतवासात राहणेच पसंत करतो. लोकांमध्ये फार मिसळणे त्याला आवडत नाही. जनसंग हा आत्मज्ञानाला प्रतिबंधक असतो. म्हणून ज्ञानवंताला लोकांमध्ये मिसळण्याचा कंटाळा असतो. तो शहरातही फारसा रहात नाही. तीर्थे, समुद्र, नदीकिनारे, गुहा, सरोवर, अरण्य यांच्या आसपास तो रहातो. समर्थ म्हणतात,
सदा सर्वी आरण्य सारुख्याकाळी।
त्यांचे स्वतःचे आचरणही अशाच प्रकारचे होते.
कधी गळ केले कधी निवळ। | विवेकचुडामणी (२७१ ३३६)
ऐसा कंठीत जावा काळ॥

१७. अध्यात्मज्ञाननित्यत्वम्  १८. तत्त्वज्ञानार्थदर्शनम्।
ज्या ज्ञानामुळे आत्मवस्तु व अनात्मवस्तु यातील भेद समजतो, प्रत्यक्ष अनुभवास येतो त्याला ज्ञान म्हणतात आणि परमात्म्याच्या एकात्मज्ञानाला तत्त्वज्ञान म्हणतात.
एका अध्यात्मज्ञानावाचून इतर ज्ञानाचा उपयोग नाही. ज्याप्रमाणे मोराच्या पिसाऱ्यावरील पिसांमध्ये डोळे

Notes

मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते।
स गुणान्समतीत्यैतान् ब्रह्मभूयाय कल्पते॥

अन्याश्रयाणां त्यागो अनन्यता (नारद भक्तिसूत्रे)

| 2011 | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| AUG | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

अहल्या द्रौपदी सीता तारा मन्दोदरी तथा। अनन्यतेचे आदर्श (पतिव्रता)

जनसंग - आत्मज्ञानाला प्रतिबंधक

असतात परंतु ज्या दृष्टीने, डोळ्यांनी मोर पहातो ती दृष्टी जर त्याला नसती तर त्या पिसाऱ्यावरील डोळ्यांचा त्याला काहीही उपयोग नाही. त्याचप्रमाणे एका अध्यात्मज्ञानाशिवाय इतर सर्व शास्त्रांचे ज्ञान अप्रमाण असे समज.

याज्ञवल्क्य - मैत्रेयी संवाद. यातून मैत्रेयीला आत्मज्ञान झाले. मानवजातीच्या धारणेसाठी म्हणून आत्मज्ञानाची थोरवी सांगितली आहे.

१२. ज्ञेयतत्त्व - परब्रह्म : ज्याला आत्मज्ञानाने जाणायचे असते ते सत् नाही असत् ही नाही. असे परब्रह्म जाणल्याने माणसाला अमरतेचा अनुभव येऊ शकतो. मी त्या ज्ञेयाचे रूप उलगडून सांगतो असे भगवान म्हणतात.

सत् - असत् या विरुद्ध पदांतही सापेक्षता आहे. चांगल्यामुळे वाईटाचा बोध होतो. न्यायावरून अन्यायाचा बोध होतो. परब्रह्म अशा द्वंद्वाच्या अतीत आहे. ते एकमेवाद्वितीय आहे. ते फक्त आत्मज्ञानाने जाणता येते.

१३ हे जे ज्ञेय असे परब्रह्म आहे ते जाणण्यास कठीण, गहन आहे हे स्पष्ट झाले, समजले. परंतु साधकांना, उपासकांना त्याचे स्वरूप कळावे म्हणून त्या ज्ञेयाची व्यापकतादि लक्षणे सांगत आहेत. सगळीकडे हात-पाय असलेले सर्व बाजूंनी डोळे, डोकी व तोंड असलेले व सर्वत्र कान असलेले आहे. ते सर्व विश्वाला व्यापून राहिले आहे. पुरुषसूक्तातही असेच वर्णन आहे.

Notes

अनादिमत्
परम - निरतिशय, देशकालवस्तुपरिच्छेदशून्य | अमर्याद
ते Object नाही तर Subject आहे.

निरतिशय, निर्विशेष, निरवयव, निरुपाधिक, निराकार, निर्गुण



परब्रह्म कोणाशी संबंधित नाही.

www.madhavveeraghuveer.com

# अत्यतिष्ठत् दशांगुलम् ।

परमात्मस्वरूप पुरुषाला सहस्त्रावधी मस्तके, नेत्र चरण आहेत. तो पृथ्वीला सर्व बाजूंनी वेढून पुन्हा दशांगुळे (दहा बोटे) शिल्लक उरला आहे.

ईश्वराची, परब्रह्माची व्यापक संकल्पना यात मांडलेली आहे. निर्गुणाचे विवेचन करण्यासाठी सगुणाचा आधार घ्यावा लागतो. अद्वैताचा उलगडा करण्यासाठी द्वैतातील उदाहरणे द्यावी लागतात. याविषयी माऊली म्हणतात - शून्य (काही नाही) दाखवायचे असते तेव्हा एक बिंदुले काढावे लागते. त्याचप्रमाणे अद्वैत जेव्हा शब्दाने सांगायचे असते तेव्हा द्वैत करावे लागते.

॥ सर्व इंद्रियांच्या विषयांना जाणणारे परंतु वास्तविक सर्व इंद्रियांनी रहित आहे. तसेच ते आसक्तीरहित आणि गुणांच्या अतीत असूनही आपल्या योग मायेने सर्वांचे धारण व पोषण करणारे आणि गुणांचा भोग घेणारे आहे. दुधाच्या अवस्थेत तूप हे दुधाच्या आकाराने असते परंतु ते दूधच तूप नसते त्याप्रमाणे ब्रह्म या सृष्टीरूप विकारास असूनही नसल्यासारखेच आहे.

(हे गुणत्रयातीत)

१५.१६- सर्वव्यापक आणि सर्वसमर्थ असे परब्रह्म चराचर भूतांच्या बाहेर आणि आत परिपूर्ण भरलेला आहे. चरही तोच आणि अचरही तोच।

*Notes*

श्रोत्रस्य श्रोत्रं मनसो मनो यद् वाचो ह वाचं
स उ प्राणस्य प्राणः चक्षुषश्चक्षुः ।

गुणा गुणेषु वर्तन्ते । इन्द्रियाणीन्द्रियार्थेषु वर्तन्ते ।

| 2011 | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| AUG | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

सगळ्यात असूनही कशातही नाही.
असंगोऽहं असंगोऽहं असंगोऽहं पुनः पुनः

विद्यारण्यस्वामी
पंचदशी

तो अति सूक्ष्म असल्याने अविज्ञेय म्हणजे जाणण्यास कठीण आहे. तो अति समीप आणि अति दूरही आहे. तो खरं तर विभागरहित एकरूप असा आकाशासारखा परिपूर्ण भरलेला असून चराचर सर्व भूतात पृथक्‌पृथक् झाल्यासारखा भासतो. तसेच तो ज्ञेय परमात्मा विष्णु-रूपाने सर्वांचे धारण पोषण करणारा आणि रुद्ररूपाने सर्वांचा संहार करणारा आणि ब्रह्मारूपाने सर्वांना उत्पन्न करणारा आहे. प्रातःकाल, माध्यान्ह, सायंकाल असा दिवस बदलत असला तरी आकाश बदलत नाही. ते सातत्याने तसेच असते. बाल्य - तारुण्य - वार्धक्य - रूप बदलत असले तरी शरीर तेच असते.

१८. ते परब्रह्म सर्वत्र विद्यमान आहे तर ते सर्वांच्या प्रत्ययाला का येत नाही? ते अंधःकारमय आहे का? तर त्याचे उत्तर 'नाही' असे आहे. उत्तर परब्रह्म प्रकाशमय आहे. ते ब्रह्म म्हणजे ज्योतींचीही ज्योती तसेच मायेच्याही पलीकडले आहे. तो परमात्मा बोधस्वरूप आणि ज्ञेय म्हणजे जाणण्याजोगा आहे आणि तसेच ते तत्त्वज्ञानाने प्राप्त होणारे आणि सर्वांच्या हृदयात स्थित आहे.

सूर्य, चंद्र, नक्षत्रे, अग्नी इ. ना बाह्य ज्योती म्हणतात. प्रलयकालात या बाह्य ज्योती लय पावतात. यांना प्रकाशित करणारे परब्रह्म हेच ज्योतींची ज्योती आहे. ही ज्योती तमसः म्हणजे मायेच्या पलीकडे आहे.

कहुँ दिसो आरती कहुँ दिसो पूजा।
कहुँ दिसो स्नान और नहीं दूजा॥

Notes

लहर ढूंढे लहरको कपडा ढूंढे सूत।
जीव ढूंढे ब्रह्मको, तीनो ऊत के ऊत॥

| T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | SEP |

एक एव हि भूतात्मा भूते भूते व्यवस्थितः ।
एकधा बहुधा चैव दृश्यते जलचन्द्रवत् ॥



| लोहचुंबक - | लोखंडाचे कण |
|---|---|
| असंग, कूटस्थ, साक्षी | चलनवलनाला प्रवृत्त. |

१८ उपसंहार - याप्रमाणे क्षेत्र तसेच ज्ञान आणि ज्ञेय जाणण्यायोग्य परमात्म्याचे स्वरूप संक्षेपाने सांगितले. हे तत्वतः जाणल्याने माझा भक्त माझ्या स्वरूपाला येऊन मिळतो.

श्लोक ३ ते ४ - क्षेत्र व क्षेत्रज्ञ
५ व ६ - क्षेत्राची ३६ लक्षणे
७ ते ११ - ज्ञानी महात्म्याची लक्षणे
१२ ते १८ - ज्ञेय ब्रह्माची २६ लक्षणे.

असे हे सर्व जाणून अनुभवून अर्जुन कृतार्थ झाला.

१९ प्रकृति अर्थात त्रिगुणमयी माया आणि क्षेत्रज्ञ अर्थात जीवात्मा या दोहोंनाही तू अनादि जाण आणि प्रीति-द्वेषादि विकारांना तसेच त्रिगुणात्मक संपूर्ण पदार्थांनाही प्रकृतिपासून उत्पन्न झालेले समज.

| | | |
|---|---|---|
| अमृतानुभवात | यांना शिव आणि शक्ती म्हटले आहे | |
| पंधराव्या अध्यायात | अक्षर | क्षर |
| सातव्या अध्यायात | परा (जीव/चैतन्य) | अपरा प्रकृति (अष्टधा) |
| आठव्या अध्यायात | अधियज्ञ चैतन्य | अधिभूत जड सृष्टी |
| तेराव्या अध्यायात | पुरुष/चैतन्य | प्रकृती/शरिर |

सूर्य हा स्वतः काहीही करत नाही पण त्याच्या अस्तित्वामुळे सर्व व्यापार चालतात. तसेच आत्मा हा शरिरात (निजल्यासारखा) आहे. म्हणून त्याला पुरुष असे

Notes

प्रकृतीसारिखे चालावे । परी अंतरी शाश्वत ओळखावे ।
सत्य होऊन वर्तावे । लोकांऐसे ॥ ११.२.४०॥

जाणत्या पुरुषाने देहाने अशाश्वत प्रकृतीप्रमाणे वागावे परंतु अंतर्यामी शाश्वत ब्रह्म ओळखून असावे, आतून ब्रह्मरूप असावे

| 2011 | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| AUG | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

बाहेरून चारचौघांसारखे वर्तन ठेवावे । आतून कीर्तन करून नमावा

www.madhaveeradhuveer.com

म्हणतात तो आत्मा (पुरुष) पत्नीशी एकपत्नीव्रताने वागतो. स्त्री पुरुष या नावाच्या भेदाने तत्वतः एक सच्चिदानंदरूप शिवच नांदत असते. शिवपणाने असलेल्या प्रकृति आणि पुरुष यांच्या अर्धअर्धपणाने सगळे जग झाले आहे.

पुरुष आणि प्रकृति हे जोडपे अनादि काळापासून एका आत्मरसाचाच अनुभव घेत आहे.

प्रकृति ही सच्चिदानंद पुरुषाच्या अस्तित्वामुळेच प्रकाशली आहे. जशी लाट ही पाण्याचे अस्तित्व घेऊन भासते. तसा पुरुषच प्रकृतिरूपाने भासत असतो. जर प्रकृतिच नसती तर पुरुषाकडे आलेला सर्वकर्तेपणाही आला नसता.

गोडी आणि गुळु । कापूर आणि परिमळु ।
निवडूं जातां पांगुळें निवाडु होये ॥
जैसी सूर्य किरणें प्रभा । भेदे सूर्यत्वाचि गाभा ।
तैसी भेद गिळीत शोभा । एकाची जे ॥ - अमृतानुभव

प्रकृति-पुरुष हे शब्द दोन परंतु अर्थ एक सच्चिदानंदघन आत्मतत्वच आहे.

केळीच्या खुंटाची सर्व सोपटे सोलून काढल्यावर त्यातील अवशेष पोकळीच रहाते त्या पोकळीचे महाकाशाशी मिळणे सहज आहे, स्वाभाविक आहे. तसेच स्थूल अन्नमय कोश मी नाही. प्राणमय, मनोमय, विज्ञानमय कोशही मी नाही. शेवटी सर्वांच्या पलीकडचा आनंदमय कोशही मी नाही. हे माझे खरे स्वरूप नाही तर यांना प्रकाश देणारा व यांना अधिष्ठानभूत असा सच्चिदानंदरूप आत्मा मी आहे.

*Notes* SUNDAY 14

| T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | SEP |

(२०) कार्य म्हणजे देह किंवा शरीर (Finished Product)
करण म्हणजे ५ ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये + (Raw Material)
(साधन) मन, बुद्धी, अहंकार
कार्य व करण यांच्या उत्पत्तीचे कारण प्रकृति म्हटले जाते आणि सुखदुःखांच्या भोक्तेपणाचे कारण जीवात्मा म्हटला जातो.
जड प्रकृतिला चैतन्याने त्याचप्रमाणे जड देहाला जीवात्म्यामुळे क्रिया प्राप्त होते. वस्तुत: आत्मा चैतन्यस्वरूप आहे त्याला कर्तृत्वही नाही आणि भोक्तृत्वही नाही म्हणूनच या श्लोकात 'उच्यते' असे क्रियापद वापरले आहे.

२१. प्रकृतित स्थित असलेला पुरुष प्रकृतिपासून उत्पन्न झालेल्या त्रिगुणात्मक सर्व पदार्थांना भोगतो आणि या गुणांचा संगच या जीवात्म्याला चांगल्या वाईट योनीत जन्म मिळण्याला कारण ठरतो.

२२. पुरुष या देहात स्थित असूनही परच आहे. केवळ साक्षी असल्यामुळे उपद्रष्टा आणि यथार्थ संमती देणारा असल्यामुळे अनुमंता, त्याचप्रमाणे सर्वांना धारण करणारा असल्यामुळे भर्ता, जीवरूपाने भोक्ता तसेच ब्रह्मादिकांचाही स्वामी असल्यामुळे महेश्वर आणि शुद्ध सच्चिदानंदघन असल्यामुळे परमात्मा म्हटला जातो. असे त्याचे सहा रूपांनी वर्णन केले आहे.

*Notes*

देहाचे गुणधर्म - कृश, स्थूल, बाल-तरुण, सुंदर-उंच
इंद्रियांचे ,, अंध, मंद, बधिर, मूक
प्राणाचे ,, - क्षुधा पिपासा
मनाचे - राग द्वेष, क्रोध, असूया, मत्सर, कपटीपणा

| 2011 | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| AUG | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

प्रत्येक जीव कामनेनुसार कर्म करतो. त्याचे फळ म्हणून ऊर्ध्व अधः योनी प्राप्त करतो म्हणून तर भगवंत म्हणतात - निस्त्रैगुण्यो भवार्जुन । २.४५

www.madhaveeraghuveer.com

देह, इंद्रिये, मन, प्राण, बुद्धि यांच्या व्यापारांच्या मागे जाऊन त्यांना जाणणारा आणि तरीही अलिप्त असणारा तो अनुमन्ता · आनंदाने, संतोषाने अनुमोदन देतो. - तथास्तु --- Blessings.

उपद्रष्टा - स्वतः क्रिया न करता साक्षीभावाने पहाणारा.
भर्ता - संपूर्ण संघाताचे पोषण करतो. स्फुरण देतो.
अनुमन्ता - अनुमोदन देणारा, यथार्थ संमती देणारा.
भोक्ता - प्रकृतिशी तादात्म्य पावतो म्हणून भोक्ता.
महेश्वर - तो श्रेष्ठ व स्वतंत्र असून सर्वांचा स्वामी आहे.
परमात्मा - तो वस्तुतः परब्रह्मस्वरूप आहे.
पंधराव्या अध्यायात म्हटले आहे.
उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः।
यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः ॥१५.१७॥

२३ याप्रमाणे पुरुषाला व गुणांच्यासह प्रकृतीला जो मनुष्य तत्त्वतः जाणतो तो सर्व प्रकारे वर्तत असूनही पुन्हा जन्मत नाही अर्थात त्याचा पुनर्जन्म होत नाही.
क्षेत्र-क्षेत्रज्ञाला तत्त्वतः जाणणे म्हणजे आत्मज्ञान होणे. असे आत्मज्ञान झाल्यावर पुनर्जन्म नाही.
अग्नित जळलेले/भाजलेले बी जसे पुन्हा उगवत नाही तसेच ज्ञानाग्निमुळे सर्व कर्मे नाश पावतात व मोक्षप्राप्ती होते. जन्ममृत्युच्या चक्रातून सुटका होते.
परंतु आत्मज्ञान झाल्यावरही कर्मे कशी चालू रहातात? उदबत्ती जळून संपल्यावर त्याचा सुगंध भरून रहातो. कुंभाराचे गोल फिरते चाक घट बनवून पूर्ण झाल्यावर सुद्धा सुरूच रहाते. तसाच आत्मज्ञानी देखील पुढे काही काळ कर्मे करतच रहातो.

Notes परंतु कार्यकरणसंघातरूप असणाऱ्या देहामध्ये स्थित असणारा 'अहं' पदाने निर्देशित होणारा 'प्रत्यगात्मा पुरुष' हा देहापासून भिन्न आहे. देह दृश्य, अनुभवजन्य, ज्ञेय आहे तर हा पुरुष मात्र ज्ञाता, द्रष्टा आहे.
। घटद्रष्टा घटात् भिन्न एव आस्ति ।

| T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | SEP |

दृश्य — चक्षु — मन — बुद्धि — अंतरात्मा
जो बघतो. परमात्मा [illegible]

Every thought is blessed by awareness only ---



२४. या आत्मज्ञानाच्या प्राप्तीचे विविध मार्ग आहेत. या श्लोकात राजयोग (ध्यानयोग) ज्ञानयोग आणि कर्मयोग यांचा स्पष्ट उल्लेख आहे.

२५. या श्लोकात भक्तियोगाचा निर्देश आहे कारण यात श्रवणभक्तीवर भर दिला आहे. वर सांगितलेली चार साधने अधिकारपरत्वे सांगितली आहेत.

उत्तम अधिकारी - ध्यानयोग - आत्म्यात निरंतर स्थिति.
मध्यम अधिकारी - ज्ञानयोग - विवेकाने
कनिष्ठ अधिकारी - कर्मयोग - ईश्वरार्पण बुद्धीने
मंद अधिकारी - भक्तियोग - श्रवणाने

२६. यच्चयावत् जे काही स्थिर किंवा चर पदार्थ उत्पन्न होतात ते सर्व क्षेत्र क्षेत्रज्ञाच्या संयोगानेच झालेले आहेत असे तू समज.
वारा सुटल्यावर ज्याप्रमाणे लाटा पाण्यावर येतात त्याप्रमाणेच या क्षेत्र क्षेत्रज्ञाच्या संयोगाने प्राणिमात्र निर्माण होतात. चराचर सृष्टी अशीच निर्माण झाली आहे.

२७ पावसाच्या धारा आकाशभर असल्या तरी पाणी एकच असते. अलंकार नाना प्रकारचे असले तरी सोने एकच असते त्याचप्रमाणे सर्व भूतमात्रात असणारा आत्मा एकच आहे; तो अविनाशी आहे. चराचर सृष्टी

*Notes*

| 2011 | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| AUG | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhaveeraghuveer.com

ही उत्पन्न होते - सञ्जायते आणि विनाश पावते परंतु त्या नाशिवंत भूतमात्रात (विनश्यत्सु) जो अविनाशी परमात्म्याला (अविनश्यन्तम्) यथार्थपणे पहातो तोच खरा पाहतो.

२८. जो अविनाशी ईश्वराला सर्वत्र पहातो तो स्वतःचा घात कधीही करत नाही.
एकतर तो प्रकृतित रमून इंद्रियांच्या पाशात अडकत नाही आणि दुसरे, म्हणजे देह नाशिवंत परंतु आत्मा अमर हे तो जाणतो म्हणून त्याला परमगती लाभते.

२९. घडणारी सर्व कर्मे ही प्रकृतिद्वाराच केली जातात. आत्मा स्वतः काहीही करत नाही. तो अकर्ता असतो हे जो पहातो तोच खरा पहातो.

30. ज्यावेळी भूतांचे निरनिराळे भाव (एका परमात्म्याच्या) संकल्पाच्या आधारे स्थित असलेले पहातो आणि त्या परमेश्वराच्या संकल्पापासून सर्व भूतांचा विस्तार झालेला पहातो तोच खऱ्या अर्थाने पहातो.
वेल चढण्यासाठी खांबाचा आधार लागतो पण खांब अलिप्त असतो त्याचप्रमाणे प्रकृतीच्या पसाऱ्याला पुरुषाचा आधार लागतो पण पुरुष अकर्ताच असतो.

Notes

| T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | SEP |

www.madhaveeraghuveer.com

३१. हा आत्मा अनादि आहे, निर्गुण आहे, अव्यय आहे त्यामुळे तो शरीराच्या ठिकाणी असूनही कर्मे करत नाही आणि सर्व कर्मांपासून अलिप्तही असतो.
ज्याप्रमाणे सूर्य पाण्यात प्रतिबिंबित झाला तरी ओला होत नाही. तद्वत शरीरस्थ आत्मा लिप्त होत नाही. कारण देहात आत्मतत्त्व प्रतिबिंबरूपाने असते.

२६ व्या श्लोकात परमेश्वर
२८ " " ईश्वर
२९ " " आत्मा
३० " " ब्रह्म
३१ " " परमात्मा

असा उल्लेख केलेले ते अंतिम तत्त्व परब्रह्म एकच आहे.

३२. ज्याप्रमाणे सर्वत्र व्याप्त असूनही आकाश सूक्ष्म असल्यामुळे लिप्त होत नाही त्याचप्रमाणे या देहात भरून राहिलेला आत्मा गुणातीत असल्याने देहाच्या गुणांनी लिप्त होत नाही.

33. दुसरा दृष्टांत सूर्याचा आहे. ज्याप्रमाणे सूर्य अखिल ब्रह्मांडाला प्रकाशित करतो त्याप्रमाणे एकच आत्मा संपूर्ण क्षेत्राला प्रकाशित करतो.
लोहचुंबक आपल्या संसर्गाने लोखंडाला हलवतो पण लोहचुंबक म्हणजे लोखंड नव्हे त्याचप्रमाणे देह व आत्मा किंवा क्षेत्र व क्षेत्रज्ञ यात भेद आहे.

*Notes*

| 2011 | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| AUG | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhaviraghuveer.com

क्षेत्रज्ञ हा क्षेत्राला प्रकाशित करतो. संकल्परहित
झाल्यावर तो मुक्त होतो.
आत्म्याच्या ठायी कर्तृत्वही नाही व भोक्तृत्वही नाही

३४ याप्रमाणे क्षेत्र व क्षेत्रज्ञ यातील भेद आणि
प्रकृति व तिचे विकार यातून सुटण्याचा उपाय
जे पुरुष अंतःचक्षुनी - ज्ञानचक्षुनी जाणतात,
यथार्थपणे जाणतात ते महात्मे परब्रह्म परमात्म्याला
प्राप्त होतात.

या अध्यायात

| | | |
|---|---|---|
| पहिले ३ | श्लोक | क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांचे स्वरूप |
| ४ था | " | वेदमंत्र, ब्रह्मसूत्र, ऋषी. |
| ५, ६ | " | ३६ तत्त्वांचा मेळा |
| ७ ते ११ | | ज्ञानप्राप्तीची १८ साधने |
| १२ ते १७ | | ज्ञेय वस्तु - परब्रह्माचे स्वरूप. |
| १८ | | परब्रह्म जाणणारा तत्स्वरूप होतो. |
| १९, २० | | प्रकृति पुरुषाचे रूप |
| २१,२२,२३ | | पुनर्जन्म मिळत नाही. |
| ३२,३३ | | दृष्टांत |

या अध्यायात अर्जुनाचा एकही प्रश्न नाही. केवळ
भगवंतच बोलले आहेत. यातील कोणताही श्लोक
सहसा उद्धृत केला जात नाही.

www.madhaveeraghuveer.com

*Notes*

SUNDAY 21

| T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | SEP |

8.00 क्षेत्र हे इंद्रियगोचर आहे तर क्षेत्रज्ञ हा सूक्ष्म, इंद्रियअगोचर
दृक् स्वरूप आहे. त्याचे ज्ञान करून घेण्यासाठी बुद्धी सूक्ष्म
9.00 अंतर्मुख असायला हवी.

दृश्यते त्वग्र्यया बुद्ध्या सूक्ष्मया सूक्ष्मदर्शिभिः। कठ. १.३.१२

10.00 ∴ ७ ते ११ श्लोकामध्ये ज्ञानसाधनेसाठी सहाय्यकारी दैवी गुण-
त्यानंतर आत्मज्ञानाची तीव्र जिज्ञासा हवी.

11.00 आत्मज्ञानाचे फळ तत्काळ प्राप्त होते. त्याचक्षणी साधक
या संसारबंधनातून मुक्त होतो.

12.00 तुका म्हणे मुक्ति परिणिली नोवरी
आता दिवस चारी। खेळीमेळी॥

1.00 अनादिमत - उत्पत्तिरहित / जे निर्मित कार्यच नाही।
केवळ कार्यालाच उत्पत्ति असते. परब्रह्म हे कारण आहे.

2.00

ज्ञानाची पाच प्रमाणे - प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, अर्थापत्ति.
3.00 अनुपलब्धि / परब्रह्म हे विदित आणि अविदित
वस्तूपेक्षा निराळे आहे. / ज्ञान आणि अज्ञान या दोन्हीही
4.00 अंतःकरणाच्याच वृत्ति आहेत.
जाणीव नेणीव भगवंती नाही.
5.00 नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः।

6.00

7.00

*Notes*

| 2011 | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| AUG | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhavaraghuveer.com